P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

# प्रेसनोट दिनांक - २४/१२/२०२३

## दि. २३/१२/२०२३ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यंत दाखल गुन्हे

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड १२२७/२०२३ भा.द.वि.कलम ३०७,५०४, ५०६(२),३४ आर्म ॲक्ट कायदा कलम ४(२५) म.पो.का.क.३७(१)(३)/१३५, क्रिमिनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ३, ७ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२२/१२/२०२३ रोजी २३/०० वा.चे सुमा.मौजे श्री.स्वामी समर्थ कॉलनी, जयभवानी चौक, श्रीनगर रहाटणी पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२३/११/२०२३ रोजी ०८/१९ वा. |
| फिर्यादी | :- | रोहीत प्रकाश गायकवाड वय २९ वर्षे,धंदा-नोकरी, रा. स्वामी समर्थ कॉलनी जयभवानी चौक, श्रीनगर रहाटणी पुणे |
| आरोपी | :- | १)विजय राहुल तलवारे अंदाजे वय-२२वर्ष रा.काळेवाडी पुणे , २)सनि राजिव गायकवाड अंदाजे वय- २३वर्ष रा. पिंपरी पुणे, ३)अनिकेत बापु बनसोडे अंदाजे वय- २४ रा.पिंपरी पुणे , **आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचा हळदीचा कार्यक्रम संपल्यानंतर रात्रौ २३/३० वा.चे सुमारास एक स्प्लेंडर मोटार सायकल नंबर एम.एच.१४/के.वाय./ ८१९१ हीचेवरुन तिन व्यक्ती जेवनाचे पंगतीमधुन ये जा करत असताना त्यांना पंगतीमधुन ये जा करण्यास मनाई केली असता त्याचा त्यांना राग आल्याने सुरवातीला आरोपी मजकुर फिर्यादी सोबत बाचाबाची करुन तेथुन निघुन गेले व त्यानंतर अंदाजे १० ते १५ मिनिटाने पुन्हा आरोपी मजकुर हे त्यांचे हातामध्ये लोखंडी कोयता व लोखंडी रॉड घेवुन येवुन आरोपी क्रं १ याने त्याचे हातातील लोखंडी कोयत्याने फिर्यादीचा मामेभाउ शक्ती बनसोडे याचेवर वार करण्याचा प्रयत्न केल्याने फिर्यादीने त्यास जोरात धक्का दिल्याने तो जमिनीवर पडला, त्यामुळे आरोपी क्रं १ याने फिर्यादीस जिवेठार मारण्याचे उद्देशाने फिर्यादीचे डोक्यात वार केला असता फिर्यादीने नमुदचा वार डाव्या हातावर घेतला, त्यामुळे फिर्यादीचे डाव्या हाताचे मनगटावर गंभीर दुखापत झालेली आहे. तसेच आरोपी मजकुर यांनी त्यांचेकडील लोखंडी रॉड व लोखंडी कोयते हवेमध्ये फिरवुन तेथे असलेल्या लोकांना कोयत्याची भिती दाखवुन "आम्ही येथील भाई आहोत आमच्या नादाला लागले तर तुमची विकेट टाकीण" असे बोलत दहशत निर्माण केली. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि नाईकनिंबाळकर, ९८८१२५२९३० |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | तळेगाव दाभाडे ६४२/२०२३ भादवि कलम ४३६, ४५४, ३८० |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २३/१२/२०२३ रोजी सांय ०५/०० वा.चे पुर्वी पहिल्या मजल्यावरील फलॅट, घर नं.४०३, शुक्रवार पेठ, चावडी चौक, तळेगाव दाभाडे, पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि २३/१२/२०२३ वेळ २३/१६ वा |
| फिर्यादी | :- | संजय रमेश बावीसकर,वय ४३ वर्ष,धंदा बांधकाम व्यवसाय,रा.फलॅट नं.१,आदित्य हाईटस, कडोलकर कॉलनी, तळेगाव दाभाडे |
| आरोपी | :- | अजय बाळकृष्ण पिंगळे, रा.तळेगाव दाभाडे, पुणे **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी याने फिर्यादी यांनी त्याचे विरुध्द दिलेल्या तक्रारीच्या कारणावरुन फलॅटचे कुलूप तोडुन जबरदस्तीने आतमध्ये प्रवेश करुन घरामध्ये आग लावुन घरामधील एकुण ८,००,०००/- रुपये कि चे साहित्य जाळुन नुकसान केले व ४०००/-रु किमंतीचे घरातील गॅस सिलेंडर व गिझर साहित्याची चोरी केली आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि खामगळ ९५६१०६५८८१ |

०३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | आळंदी ३३५/२०२३ भा द वि कलम ३०४(ब), ४९८(अ),३२३,३४, हुंडाबळी अधिनीयम कलम ३,४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २५/०९/२०२२ रोजी सकाळी १०.०० वाजता ते दि २५/५/२०२३ रोजी सकाळी ०६/३० वा सी विंग/६०४,०६ वा मजला, ब्ल्युम रेसिडेन्सी, च-होली खुर्द, ता. खेड ,जि. पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि २३/१२/२०२३ वेळ १९/०५वा |
| फिर्यादी | :- | बसवराज बसप्पा कट्टिमणी, वय ५४ वर्षे, धंदा-व्यवसाय, रा. बसवराज बसप्पा कट्टमणी , डॉक्टर आंबेडकर नगर, आश्रय कॉलनी, तालुका-ताळीकोटी, जिल्हा-विजयपुरा, पिन कोड क्र.-५८६१०१, राज्य-कर्नाटक, |
| आरोपी | :- | १)रोहित प्रकाश पुजारी, अंदाजे वय २९ वर्षे, सासु नामे २) महिला आरोपी अंदाजे वय ५० वर्षे, सासरे नामे ३) प्रकाश पुजारी, अंदाजे वय ५४ वर्षे, दीर नामे ४) राहुल प्रकाश पुजारी, अंदाजे वय ३२ वर्षे, रा.सर्व सी विंग/६०४,०६ वा मजला, ब्ल्युम रेसिडेन्सी, च-होली खुर्द, ता. खेड ,जि. पुणे **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांची भाची वय २२ वर्षे हिला आरोपी १ ते ४ यांनी संगणमताने,मामाकडुन ०५ लाख रुपये हुंडा घेवुन ये,नाहीतर येथे राहु नको, असे म्हणत हुंडयासाठी तिचा शारिरीक व मानसिक छळ करत तिला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. त्यामुळे तिने या सर्वांच्या त्रासाला कंटाळुन त्यांचे राहते घराच्या बिल्डींगच्या ०६ व्या मजल्यावरुन उडी मारुन आत्महत्या केली आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | मपोउपनि कामथे ८१८०९५१६१७ |

०४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चिंचवड ६७१ /२०२३. भादवि कलम ३२६, ३२३, ५०४,५०६,३४ आर्म ॲक्ट ०४ (२५), महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) सह १३५ तसेच क्रिमीनल ॲमेंडमेट ॲक्ट कलम-३ सह ७ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २२/१२/२०२३ रोजी रात्रौ १०/३० वा.चे सुमारास लिंक रोड पत्राशेड स्मशान भुमीच्या समोरील मोकळया जागेत,चिंचवड,पुणे. |
| गुन्हा दाखल | :- | दि २३/१२/२०२३ रोजी २२.२०वा. |
| फिर्यादी | :- | प्रमोद वामन ओगले, वय २७ वर्षे व्यवसाय खाजगी नोकरी रा. लिंक रोड, पत्रा शेड झोपडपट्टी, चिंचवड पुणे. मो.नंबर-७८८८१६५०१९ |
| आरोपी | :- | १)अमन शेख, २)आकाश मोरे, ३)आकाश राजु कांबळे, ४)अतुल भोसले सर्व रा. पत्राशेड लिंक रोड चिंचवड, पुणे **आरोपींचा शोध चालु आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे राहते घरी जात असतांना आरोपी क्र ३ याने फिर्यादीला दारुला पैसेदे असे म्हणुन लाथा बुक्याने मारहान केली. आरोपी क्र १ याने फिर्यादीचे डोक्यात कोयता मारुन फिर्यादीला गंभीर जखमी केले. आरोपी क्र ३ याने स्टीलच्या पाईप फिर्यादीचे डोक्यात डावे बाजुला मारुन जखमी केले. आरोपी क्र २ व ४ यांनी फिर्यादीला लाथा बुक्याने आणी दगडाने मारुन जखमी केले. तेव्हा फिर्यादी मदतीसाठी मोठ मोठयाने आरडा ओरडा केल्याने पत्रा शेड मधील लोक बाहेर आले असता आरोपी क्र १ हा त्याचे हातातील कोयता फिरवत लोकांना कोणी पण इथे येवु नका जो कोणी याला मदत करीन एकाएकाला मी मारीन मी अगोदर खुप लोकांना मारले आहे खुप गुन्हे केले आहे मी कोणच्या बापाला घाबरत नाही मी इथला भाई होणार आहे पुर्ण पिंपरी मला भाई म्हणुन ओळखते माझे कोणी काही वाकडे करु शकत नाही असे म्हणुन लोकामध्ये दहशत पसरविल्याने लोक घाबरुन घरात जावुन दरवाजे खिडक्या बंद करुन बसले. नंतर आरोपी क्र १ याने तु जर माझी पोलीसात तक्रार केली तर मी सुटल्यावर तुझा मर्डर करीन असे म्हणुन फिर्यादीला धमकी दिली आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि चव्हाण ९५१८७८१४८० |

०५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | महाळुंगे एमआयडीसी ८५४ /२०२३ भा.दं.वि.कलम ३०४ (अ) २७९, ३३८, मो.वा. का. कलम १८४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. २३/१२/२०२३ रोजी सकाळी ०८:३० वा. पुणे नाशिक जानारे हायवेवर साईसांगर हॉटेल समोर कुरुळी गावचे हद्यीत |
| गुन्हा दाखल | :- | दि. २३/१२/२०२३ रोजी १३.५४ वा. |
| फिर्यादी | :- | हैरी विनोद चौधरी वय २३ वर्षे व्यवसाय खाजगी नोकरी, रा. बर्गेवस्ती, कुरुळी,हनुमंत अवघडे यांच्या रुममध्ये भाडयाने, ता. खेड, जि. पुणे मुळ रा. कडीया, कादेयाखरी, राज्य उत्तरप्रदेश |
| आरोपी | :- | रुषभ सोमदत्त संख्यांक शर्मा वय ३० वर्षे रा. मोशी पुणे |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे वडील विनोद चौधरी हे पुणे नाशिक हायवे रोड पायी रस्ता क्रॉस करीत असताना पुणे बाजुकडून चाकणकडे जानारे रॉयल इनफिल्ड बुलेट गाडी क्रं. एम.एच.१४ के.टी. ५९९५ वरील चालकाने त्याच्या ताब्यातील गाडी वेगाने व लापरवाहिने चालवुन विनोद चौधरी यांना समोरुन धडक देवुन अपघात केला असुन सदर अपघातामध्ये विनोद चौधरी हे गंभिर जखमी होवुन उपचारा दरम्यान मयत होणेस कारणीभुत होवुन, स्वतः जखमी होणेस कारणीभुत झाला आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा जायभाये ८२०८९९०५६० |

०६.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चाकण १०९१/२०२३ भादवि कलम ४२०,४१७ माहीती तंत्रज्ञान अधिनियम २००० क ६६ (सी) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि ११/१०/२०२३ रोजी सकाळी ०९.०० वाजता ते दि १२/१०/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजताच्या दरम्यान मी वर्क फॉर्म होम जॉब मिळणवण्या साठी इंस्टागारम वरील जाहिरात |
| गुन्हा दाखल | :- | दि २३/१२/२०२३ २२/२९ वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | मोनं. ९०५२८९१७६६ वरुन बोलणा-या अज्ञात धारका पत्ता माहीत नाही नाव |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी वर्क फॉर्म होम जॉब मिळणवण्यासाठी इंस्टाग्राम वरील जाहिरात मधील लिंक ओपन केली असता मो.नं. ९०५२८९१७६६ यावरुन फिर्यादी सोबत व्हॉटअपव्दारे चॅटींग करुन फिर्यादीने वेगवेगळया लिंक पाठवुन फिर्यादीला सुरवातीला व्हिडीओ पाठवुन ते पाहण्याचा बदल्यात १५०/- रुपये, ११० रुपये असे २०६/- रुपये पाठवुन फिर्यादीचे बॅक खात्याची संपुर्ण माहिती विश्वासाने घेवुन फिर्यादीला ऑनलाईन टाक्स देवुन फिर्यादी कडुन गुंतवणुक म्हणुन एकुण ४ लाख ९८ हजार रुपये फसवणुक केली आहे. म्हणुन तसेच आकांक्षा जुमले यांची ३ लाख ८९ हजार रुपये, अभिशेक दरगुडे यांची ७ लाख ८३ हजार रुपये यांची देखील फिर्यादी प्रमाणेच फसवणुक झालेली आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | वपोनि कदम ८८८८१२०३३३ |

०७.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | निगडी ७६९/२०२३ भादंवि कलम ४२०,४०६,४०९,३४ सह कलम ३ व ४ महाराष्ट्र ठेवीदारांचे हितसंबधाचे संरक्षण अधिनियम १९९९ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि२१/१२/२०२१ ते अद्यापपर्यंत Trade World Market Solutions Private Limited, इन्सपिरिया मॉल,ऑफिस नं.एस/१०, दुसरा मजला, भक्ती शक्ती चौक, निगडी येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि २३/१२/२०२३ रोजी १२/३२ वाजता |
| फिर्यादी | :- | सनिल बगाराम जाधव,वय- ३४ वर्ष, व्यवसाय - नोकरी रा. फ्लॅट नं.१/११, प्राची अपार्टमेंट, आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ, निगडी, प्राधिकरण, पुणे, |
| आरोपी | :- | १)संतोष अंकुशराव चव्हाण रा इलिगंट रेसिडेन्सी को.ऑपरेटिव्ह हौसिंग सोसा.स.नं.३ जुना मुंबई पुणे हायवे, तालेरा फोर्ड शोरुम जवळ,निगडी पुणे मो.नं.९७३०००७३७९.<br>२)महीला आरोपी, ३)संकेत भागवत रा - दापोडी पुणे मो.नं. ७३५०६२०७३१<br>४)दिपक शिंदे रा च-होली पुणे मो.नं. ९८५०६१९८४३ **आरोपी अटक नाही** |

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी **Trade World Market Solutions Private Limited** या कंपनीचे मालक आरोपी क्र १ व २ तसेच एजंट आरोपी क्र ३ व ४ यांनी आपआपसात संगणमत करुन फिर्यादी व त्यांचेप्रमाणे इतर गुंतवणुकदारांचा विश्वास संपादन करुन फिर्यादी यांनी नमुद कंपनीमध्ये गुंतवलेल्या रक्कमेवर जास्तीचा परतावा देण्याचे आमिष दाखवुन फिर्यादी व इतर गुंतवणुकदार यांनी नमुद कंपनीत गुंतवणुक केलेली एकत्रित रक्कम रु. ६,६५,३४,३१०/-चा अपहार करुन फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि इंगळे आर्थिक गुन्हे शाखा पिंपरी चिंचवड

०८.

पोस्टे व गु रजि.नं. :- वाकड १२३३/२०२३ भा.द.वि.कलम- ३४ व अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ चे कलम ४,५ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि २३/१२/२०२३ रोजी सायंकाळी १८.०५ वा चे सुमारास साई लॉज, ताथवडे, पुणे. याठिकाणी

गुन्हा दाखल :- दि २३/१२/२०२३ रोजी २३.५५ वा

फिर्यादी :- ललीता धोंडीराम भरसट, म. पो. शि. ३६४८ वाकड पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड आयुक्तालय.

आरोपी :- १) गौतम मो.क्र. ८६६९९७०९०७ पुर्ण नाव-पत्ता माहित नाही.
२) फईम ऊर्फ एम.डी. मो.क्र. ७९७२३५६४२९ पुर्ण नाव-पत्ता माहित नाही.
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी यांनी संगनमत करुन पिडीत महिला हिस पैशांचे अमिष दाखवून तिला वेश्या व्यवसायासाठी प्राप्त करुन व्यवसायासाठी प्रवृत्त करुन तिच्याकडून वेश्याव्यवसाय करवून घेऊन त्यातून मिळालेल्या रकमेतून स्वतःची उपजिविका भागवित असताना मिळून आले म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि लोहार ९८५०२२९१९०

०९.

पोस्टे व गु रजि.नं. :- चाकण १०९२/२०२३ भा द वि कायदा कलम ३८५, ५०४,५०६, फौजदारी सुधारणा कायदा २०१३ कलम ३,७

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि २३/१२/२०२३ रोजी रात्री १०.०० वा. च्या सुमारास नेहरु चौक चाकण येथे ता खेड जि पुणे

गुन्हा दाखल :- दि २४/१२/२०२३ रोजी ००.४६ वा

फिर्यादी :- मोमीन अहमद आन्सारी, वय ३० वर्षे, धंदा- बेकरी चालक, रा. भगवंत रेसीडेंन्सी बी. बींग, देशमुख आळी, चाकण ता. खेड जि. पुणे, मुळ रा. नहटोर ता.जि. बिजनोर दिल्ली.

आरोपी :- विवेक ऊर्फ युडया रामदास कु-हाडे रा. दत्त मंदिर जवळ, बलुताअळी चाकण ता. खेड
**आरोपी अटक आहे**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी नेहरु चौक चाकण येथे फिर्यादी बेकर्स ब्राउन बेकरीत असताना नमुद आरोपी हा फिर्यादीच्या बेकरीवर आला व त्याने फिर्यादीला १५००/- रुपये मागीतले फिर्यादी यांनी त्यास कशाचे पैसे विचारले असता नमुद आरोपीने तुझी बेकरी चालवायची असेल तर मला १५००/- रुपये हप्ता दयावा लागेल नाही दिला तर तु बेकरी कशी चालवितो तेच मी बघतो मी या भागाचा दादा आहे माझ्यावर खुनाचा गुन्हा दाखल आहे असे म्हणुन बेकरी समोर जोर जोरात मोठ मोठयाने आरडा ओरड करुन फिर्यादीला शिवीगाळ करुन दहशत निर्माण केली. व मला हाप्ता दिला नाही तर कोयत्याने मारहाण करतो अशी धमकी दिली. त्याचे दहशतीमुळे फिर्यादीचे बेकरीत आलेले गि-हाईक व आजुबाजुचे लोक भितीने तेथुन पळुन गेले. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि गायकवाड ९६८९३२३१२३

१०.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | दिघी ६९३/२०२३ भा.दं.वि कलम ३०४ अ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि १९/१२/२०२३ रोजी दुपारी १२.३० चे सुमारास कमलराज व्ही स्क्वेअर बिल्डींग चे चालु बांधकाम दिघी ता हवेली जि पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि २३/१२/२०२३ रोजी १८.३४ वा. |
| फिर्यादी | :- | रमेश विठठल मते पोहवा १०५७ दिघी पोलीस स्टेश्न |
| आरोपी | :- | परमेश्वर रमेश बेहरा वय ३८ वर्ष रा फलॅट नं ४०१ ए विंग जय हिंद रेसीडेन्सी रोडे हॉस्पीटल जवळ दिघी जा हवेली जि पुणे **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी कमलराज व्ही स्क्वेअर बिल्डींग चे चालु बांधकाम दिघी ता हवेली जि पुणे येथे इमारतीचे बी विंग मधील तिसरा मजला फलॅट नं ३०८ चे बाथरुमचे बाहेरील बाजुस डक मध्ये प्लंबींगचे काम करताना कामगार नामे अजय अक्षय बेहरा वय २२ वर्ष सध्या राहणार कमलराज प्रयाग दिघी मुळगाव - गोपालपुरा जि केंद्रापाडा राज्या उडीसा पिन कोड ७५४२२५ यास त्याचा ठैकेदार नामे परमेश्वर बेहरा वय ३८ वर्ष रा फलॅट नं ४०१ ए विंग जय हिंद रेसीडेन्सी रोडे हॉस्पीटल जवळ दिघी जा हवेली जि पुणे यांनी बांधकामाचे सुरक्षा व्याववस्था न पुरवल्याने निष्काळजीपणामुळे तिस-या मजल्यावरुन खाली पार्किंगचे स्लॅवर पडुन जखमी होवुन मरणास कारणीभुत झाला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि कटपाळे ८६५२४१७२७२ |

११.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | दिघी ६९६ /२०२३ भा.द वि कलम ४२० |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २३/१२/२०२३ रोजी सायंकाळी ०४/०० वा चे दरम्यान पुणे आंळदी सार्वजनिक रस्त्यालगत असलेल्या वाळके पान शॉपी ते सनाईस कॅफे समोर दत्त नगर ता.हवेली जि.पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि २३/१२/२०२३ रोजी २२/२३वा |
| फिर्यादी | :- | पंकज भास्करराव डुकरे वय ४० वर्षे धूंदा-नोकरी रा.तनिष आयकॉन सोसायटी ए विंग,प्लॅट नं ४०४, दत्त नगर दिघी ता.हवली जि.पुणे |
| आरोपी | :- | अनोळखी इसम |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे पान खाण्यासाठी जात असताना सनराईस कॅफे मधून एक साधु भगव्या कपडयामध्ये फिर्यादी जवळ येवून साधूने काहीतरी तोडांतल्या तोंडात शब्द पुटपुटले फिर्यादीचे बोटातील २०,०००/- रु किंमतीची ६ ग्रॅम वजनाची सोन्याची आंगठी त्याने विश्वासाने काढण्यास सांगून फिर्यादीचा विश्वास संपादन करून फसवणूक करून घेवून निघून गेला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा मते, ८४८४९२९५४८ |